# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

## छत्रपती संभाजीनगर

नॅक 'अ+' दर्जा प्राप्त

परीक्षा व मूल्यमापन विभाग

**तात्काळ परिपत्रक**

या परिपत्रकाव्दारे सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व अध्यापक यांना कळविण्यात येते की, उन्हाळी-२०२५ च्या मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा अनुक्रमे दि. ०८.०४.२०२५ व २९.०४.२०२५ रोजी पासून सुरु झालेल्या असुन सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व धाराशिव जिल्हा निहाय व क्षेत्रिय मूल्यमापन केंद्र निश्चित करण्यात आलेले आहे व सदर मूल्यमापन केंद्रांवर उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कार्य सुरु आहे.

त्यानुसार कस्टोडियन, सर्व संबधित जिल्हा व क्षेत्रिय मूल्यमापन केंद्र यांनी सर्व संबंधित पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अध्यापकांना उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी नियुक्ती आदेश निर्गमित केलेले आहे. परंतु अद्यापर्यंत अनेक महाविद्यालय/परिसंस्थेतील अध्यापक उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी जिल्हा व क्षेत्रिय मुल्यांकन केंद्रावर रुजू झालेले नाहीत. असे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम-८९ मधील तरतुदीनुसार सर्व परीक्षांचे निकाल परीक्षा संपल्याच्या शेवटच्या दिनांकानंतर ३० दिवसांच्या आत लावणे बंधनकारक आहे.

**सबब, ज्या जिल्हा व क्षेत्रिय मूल्यमापन केंद्राकडून संबंधित अध्यापकांना उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे आदेश निर्गमित झालेले आहेत किंवा सुचना प्राप्त झालेल्या आहेत अशा सर्व अध्यापकांना संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांनी आदेश प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसांच्या आत उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी पुर्णवेळ कार्यमुक्त करावे व त्याबाबतचा अहवाल dcasunit.exam@bamu.ac.in या ई-मेल आयडीवर सादर करण्यात यावा. ज्या महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक अध्यापकांना उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी कार्यमुक्त करणार नाहीत व जे अध्यापक उत्तरपत्रिका मूल्यमापनसाठी जिल्हा व क्षेत्रिय मूल्यमापन केंद्रावर रुजू होणार नाहीत. त्यांच्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४८(४) मधील तरतुदी प्रमाणे परीक्षेच्या कामात कसूर केल्याप्रकरणी कार्यवाही करण्यात येईल. याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी.**

करिता, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर :
संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२५/४०६ :
दिनांक : १३.०५.२०२५ :

**प्रा. (डॉ.) बी. एन. डोळे**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ